आपला महाराष्ट्र

# महाराष्ट्राची चिंताजनक पीछेहाट

गेल्या आठवड्यात महाराष्ट्राचे सरकार स्वित्झर्लंड मध्ये जाऊन आले. दावोसला त्यांनी काही कंपन्यांशी सुमारे १५ लाख कोटीहून अधिक गुंतवणुकीचे करार केले. तिथे आणि नंतर मुंबईत येऊनही दावोसच्या दौऱ्याची मीडियासमोर इतिश्री झाली. महाराष्ट्रभर शासक पक्षाच्या नेहमीच्या भक्तगणांनी प्रचंड उत्साहात गुंतवणुकीचे स्वागत केले. महाराष्ट्र अशा पद्धतीने पुढे जात असेल तर कोणीही आनंदच व्यक्त करेल. त्यात दुःखी होण्याचे काही कारण नाही. मात्र हे करार मुंबईत देखील होऊ शकले असते कारण त्यातल्या २८ कंपन्या ह्या पुणे आणि मुंबई या महानगरात पंजीकृत झालेल्या आहेत. आपल्या कंपन्या दावोस येथे जाऊन आपल्याशीच करार करतात ही बाब खटकणारी म्हणावी लागेल. काहीही असो त्या दौऱ्याचे फलित म्हणून या गुंतवणुकीचे स्वागतच केले पाहिजे. त्यानुसार ते केले आहे. मात्र त्याचवेळी महाराष्ट्र कसा आणि किती रसातळाला जात आहे त्याविषयीची आकडेवारी मती गुंग करणारी आहे. खुद्द शासक पक्षाचे सरकार केंद्रा त आहे आणि त्यांची आर्थिक सल्लागार परिषद आहे. वाणिज्य मंत्रालयाची राज्यांच्या प्रगतीची यादी आहे. रिझर्व बँकेचा अहवाल आहे. त्याचप्रमाणे निती आयोगाचा वित्तीय निर्देशांक अहवाल आहे. या सर्व अहवालात महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावर असून महाराष्ट्राच्या तुलनेत मागे असलेली छत्तीसगड, तेलंगणा कर्नाटक, तामीलनाडू ही राज्ये पुढे गेली आहेत. वित्तीय निर्देशांकात ओडिषा, छत्तीसगड, गोवा, झारखंड, गुजरात यांच्यानंतर महाराष्ट्र आहे. पूर्वी तो एक नंबर वर होता आता सहाव्या नंबरवर आहे. ही चिंतेची बाब म्हणावी लागेल. राज्यकर्त्यांना ती चिंतेची वाटत नसावी. कारण त्यांना रेवडी वाटपावर जास्त प्रेम आहे. यापूर्वी महाराष्ट्र अशा पद्धतीने वाटचाल करणाऱ्या राज्यात नव्हता. आता स्वस्त लोकप्रियतेसाठी आणि मतांसाठी महाराष्ट्राने कर्ज काढून रेवडी वाटप सुरू केलेले आहे हे दुःखदायक म्हणावे लागेल. यालाच ऋण काढून सण साजरा करणे म्हणतात. आज जे वित्तमंत्री आहेत तेच यापूर्वीही वित्त मंत्रालय सांभाळत होते. तेव्हा त्यांचा अशा प्रकारच्या रेवडी वाटपाला विरोध होता. आता तेच लाडक्या बहिणींवर तरतुदी करीत आहेत याचे आश्चर्य वाटते. नुकताच पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचा पाहणी अहवाल प्रसिद्ध झालेला आहे त्यात म्हटले आहे की गेल्या दशकभरात राष्ट्रीय पातळीवरील सकल राज्य उत्पन्नात महाराष्ट्र १५ टक्क्यावरून तेरा टक्क्यावर खाली आला आहे. महाराष्ट्राची आर्थिक आघाडीवर पीछेहाट झाल्याचे स्पष्टपणे पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीने आपल्या अहवालात म्हटले आहे. रिझर्व बँकेने राज्यांच्या आर्थिक प्रगती बाबत तयार केलेल्या अहवालात देखील महाराष्ट्र मागे असल्याचे म्हटले आहे. अशाप्रकारे शासक पक्षानेच नियुक्त केलेल्या यंत्रणांचे सर्व अहवाल महाराष्ट्राच्या विरोधात गेलेले असल्याने बाहेरचे गुंतवणूकदार इथे येण्यास तयार नाहीत. बोंब मारणारे अहवालच त्यास कारणीभूत आहेत. अर्थात हे अहवाल महाराष्ट्राच्या सुमार कामगिरीमुळे तयार झालेले आहेत हा भाग अलाहिदा.

देशी आणि विदेशी गुंतवणूकदारांना मुंबईचे आणि पुण्याचे आकर्षण आहे ही गोष्ट खरी परंतु महाराष्ट्रात वाढलेली दडपशाही, वित्तीय क्षेत्रातील दादागिरी, आकंठ भ्रष्टाचारात बुडालेली नोकरशाही आणि लोकप्रतिनिधी आणि अनैतिक राजकारण यामुळे महाराष्ट्रासह मुंबई पुण्याला लांच्छनास्पद डाग लागलेले आहेत. याकडे नवनिर्वाचित सरकार जर लक्ष देणार नसेल तर महाराष्ट्राची घसरगुंडी कायम असेल. मग महाराष्ट्र आता थांबणार नाही असे कितीही उच्चारवाने सांगितले तरी त्याचा काही उपयोग होणार नाही. कर्जाचे व्याज अदा करण्यासाठी जर कर्ज घ्यावे लागणार असेल तर मग आर्थिक नियोजन ढासळलेले नाही असे म्हणणे हास्यास्पद ठरेल. जर रेवडी वाटप सुरूच राहणार असेल, त्यासाठी कर्ज काढावे लागणार असेल तर महाराष्ट्र भविष्यकाळात कधीही पुढे येणार नाही. मग सत्तेत सरकार कोणाचेही असो. कारण एका सरकारने तयार केलेली पाऊलवाट दुसऱ्या सरकारला मोडून काढता येत नाही. त्याच वाटेने त्या सरकारला देखील चालावे लागते. परिणामी आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत नाही. हे राज्य दिवाळखोरी कडे निघाल्याचे लक्षण आहे. नुकताच राज्य परिवहन महामंडळाने तेराशे बस गाड्यांच्या खरेदी प्रकरणात भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले. तो करार मुख्यमंत्र्यांनी रद्द केला. यावरून लक्षात यावे की यंत्रणा किती पोखरलेल्या आहेत. अशाच पद्धतीने जर सरकार म्हणून सत्तेत बसलेले लोकप्रतिनिधी देखील पोखरलेले असतील तर मग बघायची सोय नाही. नेमकी तीच परिस्थिती महाराष्ट्रात सध्या आहे. कारण राजकीय गुणवत्तेत फारसा फरक पडलेला नाही. गेली अडीच वर्षे जे सरकार अस्तित्वात होते ते गेले आणि तशाच पद्धतीचे त्यांनाच घेऊन दुसरे आले. म्हणजे नागनाथ गेला आणि सापनाथ आला एवढाच काय तो फरक झाला.निती आयोगाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील खर्चाचे प्रमाण अन्य मोठ्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात कमी आहे असे म्हटले आहे. एकूण खर्चाच्या तुलनेत आरोग्यावरील खर्च ४.३ टक्के असून इतर मोठ्या राज्यांचे प्रमाण ५.७ टक्के आहे. राज्याचा जो अनाकलनीय वाढता खर्च आहे त्यामुळे आर्थिक तूट निर्माण झालेली आहे आणि गेल्या सहा वर्षांत कर्जाच्या प्रमाणात वर्षाला सुमारे दहा टक्के एवढी वाढ झालेली आहे. हा निती आयोगाचा अहवाल असून याबाबत. निती आयोगाचा किंवा कॅगचा अहवाल जेव्हा जेव्हा आला तेव्हा तेव्हा शासक पक्ष त्यावेळी विरोधात असताना आकाश पाताळ एक करीत होता. मात्र आता त्यांच्याबाबतच अशा प्रकारचा अहवाल त्यांच्याच यंत्रणांनी दिलेला असूनही ब्र शब्द देखील ते बोलायला तयार नाहीत. शासकच जर इतके निगरगट्ट होत असतील तर त्यांचे प्यादे हे देखील निगरगट्ट असणार हे ओघानेच आले. राजे राजवाडे, देश, संस्थाने अशा प्रकारेच रसातळाला गेल्याचा इतिहास आहे. यातून अराजकाला निमंत्रण मिळते.

दुसरा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राज्यातील सरकारी शाळांचा आहे. कोरोना काळात कशाबशा या शाळा सावरलेल्या असताना दोन वर्षात पुन्हा सहा वर्षांपूर्वीची अवस्था या शाळांना आली आहे. प्रथम एज्युकेशन फाउंडेशन या संस्थेने देशभर जे काही सर्वेक्षण केले त्यानुसार त्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष काल-परवाच जाहीर झाले आहेत. या अहवालानुसार ३२ जिल्ह्यातील ३३ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार शाळांची अवस्था, विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधांचा अभाव, शालेय शिक्षणासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री, नव्या शैक्षणिक धोरणानुसार संगणकांचा अभाव, जिथे संगणक आहेत ते निकामी असणे, जिथे प्रसाधने आहेत ती निकामी असणे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या शाळातील जी काही उपस्थिती आहे त्यांची गुणवत्तेच्या संदर्भातील घसरण याचा अर्थ त्या शाळांमधून शिकविणारे शिक्षक यांची उदासीनता या सर्व बाबी या शाळा ओस पडण्यास कारणीभूत आहेत. पुन्हा या शाळेतील मुलांचा ओढा अर्थात त्यांच्या पालकांचा ओढा खाजगी शाळांकडे त्यातल्या त्यात इंग्रजी शाळांकडे वळला आहे. असर नावाच्या या संस्थेने जो काही महाराष्ट्रातील शिक्षणाच्या अधोगतीचा पंचनामा केला तो चिंताजनक म्हणावा लागेल. २५% विद्यार्थ्यांना इयत्ता दुसरीचे मराठी वाचता आलेले नाही तर ६४% विद्यार्थ्यांना तीन अंकी संख्येला एका अंकाच्या संख्येने भागता आलेले नाही. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे आठवीच्या २६ टक्के विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्गातील मराठी भाषेतील परिच्छेद वाचता आलेला नाही.. छोटी छोटी वाक्ये देखील आठवीतले विद्यार्थी वाचू शकत नाहीत हे दुर्दैव असून अशा शिक्षकांना सरकार का पोसत आहे असा प्रश्न सर्वसामान्य माणसाच्या मनात निर्माण झाला पाहिजे. आणि त्याचा जाब त्यांनी सरकारला विचारला पाहिजे तसे होत नसल्यामुळे सगळ्यांना रान मोकळे झालेले आहे. विचारणा केली, धारेवर धरले तर विचारणाराला कुठे अडकून टाकतील सांगता येणार नाही. त्यामुळे तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करणे भाग आहे. लोकांच्या मनात प्रचंड भीती आहे. असे राज्य आमचे असेल तर ते प्रगतिशील आहे. विकसनशील आहे, किंवा परिवर्तनवादी आहे. शाहू फुले आंबेडकरांचे आहे असे कसे म्हणता येईल?.

# चोवीस फेब्रुवारीला शेतकऱ्यांच्या खात्यावर येणार पीएम किसानचा एकोणविसावा हप्ता

**शिंदखेडा, दि.२९ (प्रतिनिधी)- डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीतील पीएम किसानचा १९ वा हप्ता दि.२४ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एका समारंभात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.**

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न देण्याकरिता केंद्र सरकारने किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे, या योजनेच्या निकषानुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्याची १८ वर्षांखालील अपत्ये)रु.२००० प्रती हप्ता याप्रमाणे तीन समान हप्त्यांत प्रती वर्षी रु.६००० त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात जमा येत आहे. पी.एम. किसान योजनेअंतर्गत दि.२४ फेब्रुवारी २०२४ अखेर राज्यातील ११३.६० लाख शेतकरी कुटुंबांना एकूण १५ हप्त्यामध्ये रु.२७६३८ कोटीचा लाभ देण्यात आला आहे हा समारंभ केंद्र सरकारचा कृषी विभाग व महाराष्ट्र राज्य सरकार यांनी एकत्रितपणे राबविण्यात येणार आहे. पी एम किसान योजना व महाराष्ट्र शासनाची नमो शेतकरी महासन्मान निधीचा लाभ वितरण समारंभात लिंकद्वारे सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येत आहे. अनेक शेतकऱ्यांची बँक खाती चुकीची जोडली गेली आहेत, राज्यातील काही बँकांचे विलीनीकरण किंवा इतर कारणाने बदलले आहेत. परीणामी या शेतक-यांना किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळत नाही ये. याचबरोबर केंद्र सरकारच्या नव्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत सर्व नोंदणीकृत लाभार्थ्यांना माहे सप्टेंबर २०२२ नंतर जमा होणारे सर्व हप्ते हे आधार संलग्न बँक खात्यात अदा करण्यात येणार आहेत. सर्व लाभार्थ्यांनी आधार संलग्न बँक खाती तात्काळ आधार संलग्न करावेत असे निर्देश कृषी आयुक्तांनी दिले आहेत. याचबरोबर ज्या लाभार्थ्यांचा डाटा एनपीसीआयशी आधार लिंक नसल्यास अशा या योजनेच्या लाभार्थ्यांना नंतरचे हप्ते वितरीत होणार नाही. त्यामुळे राज्यात एकही शेतकरी लाभापासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रत्येक जिल्हा अग्रणी बँकेच्या समन्वयाने राज्यात शिबीराचे आयोजन करुन प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांचा डाटा एनपीसीआयशी आधार लिंक करण्याचे आवाहन संबंधित यंत्रणांना शासनाच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत.



# पौगंड अवस्थेतील जाणीव कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**धुळे, दि.२९- का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचालित रेऊ वाणी विज्ञान विहार व आजीवन अध्ययन व विस्तार शिक्षण उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावतर्फे विद्यार्थ्यांसाठी पौगंड अवस्थेतील जाणीव कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रा.पाठक यांनी केले.**

याप्रसंगी प्रा.पाठक, प्रमुख अतिथी डॉ.अभिनय दरवडे यांनी मनोगत व्यक्त केले. पौगंडावस्थेतील जाणीवांबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात प्रा.डॉ.शोभा शिंदे यांनी शिका कसे शिकावे ते या विषयवार मार्गदर्शन केले. द्वितीय सत्राच्या मार्गदर्शिका डॉ.विभा इंदानी यांनी मानसिक आरोग्याचे तीन स्तंभ या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात डॉ.तुषार भट यांनी पौगंड अवस्थेतील शारीरिक व मानसिक बदल समजावून सांगितले. सदर कार्यशाळेत १३५ विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तेने सहभाग घेतला, अशी माहिती प्रशासन प्रमुख वैशाली सोनगिरे यांनी दिली.



# आरोग्य परिसेविका उज्वला मोरे यांना फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्कार

**दोंडाईचा, दि.२९- उपजिल्हा रुग्णालयातील अतिशय चोखपणे कर्तव्य बजावणारे परिसेविका तथा (इन्चार्ज सिस्टर) उज्वला मोरे यांना मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. दोंडाईचा येथील उपजिल्हा रुग्णालय स्थापन झाल्यानंतर पहिल्यांदाच या पुरस्काराचा बहुमान उज्वला मोरे यांना मिळाला आहे.**

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत धुळे येथे २०२३-२४ फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्काराचे वितरण करण्यात आले. दोंडाईचा येथील उपजिल्हा रुग्णालय येथे उज्वला मोरे या परिचारिका आहेत. मागील २५ वर्षांपासून त्या आरोग्य सेवेत कार्यरत आहेत. कोविड १९ सारख्या महामारी मध्ये स्वतःच्या जीवाची परवा न करता आणि न डगमकता रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा या भावनेने दिली याचीच पोचपावती म्हणून जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी जिल्हा परिषद धुळे यांच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाने परिसेविका उज्वला मोरे यांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याबद्दल जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.दत्ता देगावकर, डॉ.भरत कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी, डॉ.ललितकुमार चंद्रे, डॉ.सलमान कुरेशी, डॉ.पूजा पाटील, डॉ.तेजस जैन, डॉ.पारुल अग्रवाल आदींनी अभिनंदन केले आहे.

# एसआरबी इंटरनॅशनल स्कूल येथे शिक्षण परिषद संपन्न

**शिरपूर, दि.२९- दहिवद येथील एसआरबी इंटरनॅशनल स्कूल येथे जिल्हा परिषद शाळा तांडे आणि गोदी तसेच एसआरबी इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने जानेवारी महिन्याचे केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन धुळे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे पंचायत समिती शिक्षण विभाग यांनी केले.**



केंद्रप्रमुख रणजीतसिंग ठाकूर यांच्या हस्ते शिक्षण परिषदेला सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम शाळेच्या संचालिका सौ.मानसी बाविस्कर यांनी केंद्रप्रमुख ठाकूर यांचा सत्कार केला. यानंतर माजी केंद्रप्रमुख हिलाल पाटील यांचा सत्कार शाळेचे प्राचार्य सुभाषनाथ पटले यांनी केला. यावेळी पदवीधर जिल्हा सरचिटणीस दत्तू पाटील, मुख्याध्यापिका रजनीताई बोरसे, राज्य उपाध्यक्ष नगराम जाधव, तांडे शाळेचे मुख्याध्यापक सुनील पाटील, तालुका अध्यक्ष कपिल मोरे, साधन व्यक्ती मुळावदकर, आशा पाटील व बडे गोदी हे उपस्थित होते.माहे जानेवारीच्या शिक्षण परिषदेचा वेळापत्रकानुसार ज्ञानरचना वादावर आधारित प्रभावी पाठ सादरीकरण आणि इंग्रजी कम्युनिकेशन स्किल याविषयी शिक्षक भटू धाकड यांनी मार्गदर्शन केले. शिक्षिका अनिता शिंदे यांनी गणित विषयाच्या अपूर्णांक या पाठाचे प्रभावीपणे सादरीकरण केले. यावेळी आपल्या वर्गाची सध्याची गुणवत्ता आणि केंद्रातील शैक्षणिक गरजांवर चर्चा व पुढील नियोजन तसेच शालेय पोषण आहाराच्या संदर्भात मार्गदर्शन केंद्रप्रमुख ठाकूर यांनी केले.

सूत्रसंचालन शिक्षक बी.आर. महाजन यांनी केले तर आभार हर्षवर्धन जाधव यांनी मानले. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती भाग्यलक्ष्मी बाविस्कर, सेक्रेटरी चेअरमन डॉ.धीरज बाविस्कर, संचालिका सौ.मानसी बाविस्कर, प्राचार्य पटले, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. निवेदिता दुबे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.



धुळे- देवपूर प्रभाग क्रमांक दोन मधील हजारे कॉलनी अंतर्गत रस्ता डांबरीकरणाचा शुभारंभ करतांना आमदार अनुप अग्रवाल. समवेत डॉ.सुभाष भामरे, भाजपाचे प्रदेश सरचिटणीस सुशील महाजन, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, अनिल नागमोते, भारती माळी, नंदू सोनार, सुबोध पाटील, प्रथमेश गांधी, अजित राजपूत, वैशाली सोनवणे, निर्मला पाटील, लता भावसार, राखी गुरव, आशा करोडे, संगीता भावसार, ज्योत्स्ना सोनवणे, संध्या पाटील, त्रिवेणी सोनवणे आदी.

## रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धुळे म.न.पा. हद्दीतील मौजे बाळापूर येथील ग.नं.९२/१ पैकी प्लॉट नं.२१/ब चे एकूण क्षेत्र १३०.९० चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा- पुर्वेस- प्लॉट नं.२१अ, पश्चिमेस- प्लॉट नं.२२ व २३अ, दक्षिणेस- प्लॉट नं.२५, उत्तरेस- रस्ता.

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील बखळ प्लॉट हा सौ.सुनीता सुनिल मराठे रा.लोकमान्य कॉलनी, ८० फुटी रोड, धुळे यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे मिळकत ही आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर बखळ प्लॉटवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत आल्यास तसेच सदर बखळ प्लॉटवर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी, जनरल मुखत्यार हक्क, मृत्युपत्र, सौदापावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर वैयक्तिकपणे कागदपत्रासह कळवावी. मुदतीत हरकती अगर तकारी न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या अशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली आहे.

दिनांक- २९/०१/२०२५,
ठिकाण- धुळे.

**ॲड.प्रमोद एम.चौधरी**
११४, गोविंदा अपार्टमेंट, देवपूर, धुळे.
**मो.नं.९८६०७०६१७१**



शहादा- येथील पोलीस ठाण्यात भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण पोलीस निरीक्षक निलेश देसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स.पो.नि. प्रवीण सोनवणे, प्रतापसिंग मोहिते, पो.स.ई. छगन चव्हाण, अभिजीत अहिरे, भुनेश मराठे, राजेश इंदवे सह. पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## CHANGE OF NAME

MY PREVIOUS NAME WAS **SUMAYYA BI MUKHTAR AHMAD** AND MY NEW NAME IS **SUMMIYA BANO MUKHTAR AHMED ANSARI**
HOUSE NO.115 AYYUB TYLES KE PASS HABIBI SCHOOL, DHULE-424001

## CHANGE OF NAME

MY PREVIOUS NAME WAS **MUKHTAR AHMAD MUHAMMAD RAMZAN** AND MY NEW NAME IS **MUKHTAR AHMED MOHAMMAD RAMZAN ANSARI**
HABIBI SCHOOL KE PASS, KABIR GANJ AYYUB TYLES KE PASS, DHULE-424001

## शिरपूर वरवाडे नगरपरिषद
ता. शिरपूर जि. ४२५४०५ पिन, धुळे
SHIRPUR VARWADE MUNCIPAL COUNCIL Tal:Shirpur, Dist:Dhule Pin:425405
E-mail Id:-shirpurnagarparishad@gmall.com Phone No.2563-255042/255742

जा.क्र.३८४९/आरोग्य/२०२४-२५ दि. २८/०१/२०२५

## ई-निविदा सूचना

मुख्याधिकारी शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर, जि. धुळे आरोग्य विभाग मार्फत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ३ मे. टन क्षमतेचा विकेंद्रीत खत प्रकल्प (Unit of Decentralised Compost Plant) चालविणे व देखभाल दुरुस्ती करणेकामी शासनमान्य नोंदणीकृत व पात्र मक्तेदारां मार्फत दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा प्रणालीद्वारा Online (महाराष्ट्र शासन यांच्या कडील नोंदणीकृत निविदाधारकांकडून दोन लिफाफा पद्धतीने फेर-ई निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा व अटी शर्ती दि.३०/०१/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून https://maharashatra.gov.in या संकेतस्थळावर पहावयास उपलब्ध आहे.

| सही-/XXX | सही-/XXX |
|---|---|
| **मुख्याधिकारी** | **प्रशासक** |
| शिरपूर वरवाडे नगरपरिषद | शिरपूर वरवाडे नगरपरिषद |
| शिरपूर जि. धुळे | शिरपूर जि. धुळे |

## विदुनमला जैन यांचे निधन

धुळे, दि.२९- जुने धुळे भोलेबाबा मंदिराजवळील रहिवासी विदुनमला प्रभाकर जैन यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. वृत्तपत्र विक्रेता प्रथमेश एजंसीचे संचालक प्रभाकर जैन यांच्या त्या पत्नी होत.

प्रकाश में आज अमीर गरीब










## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.५६/२०२५,
नि.नं.६ चौ.ता.२४/२/२०२५

१) नागनबाई भटू पाटील, २) प्रथमेश भटूल साळुंके,
३) देवयानी भटू पाटील, अर्जदार नं.१ स्व:साठी व अर्जदार नं.२,
याची अ.पा.क. आई म्हणून
सर्व रा.भदाणे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही. ..... **जाबदेणार**
अरूणाबाई संतोष पाटील, मयताचा पत्ता- भटाणे, ता.शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.१३/०३/२०२४ ..... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांची सासू, अर्जदार नं.२ व ३ यांची आजी नामे अरुणाबाई संतोष पाटील ह्या दि.१३/०३/२०२४ रोजी मौजे भटाणे, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेल्या आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.२४/२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत या प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे.

| कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
|---|---|---|
| दिवाणी न्यायालय, शिरपूर | | दिवाणी न्यायालय, शिरपूर |

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.७०/२०२५
नि.नं.६/ड चौ.ता.२५/२/२०२५

१) कमलबाई नथ्थू पवार (पाटील), २) संदिप नथ्थू पाटील,
नं.१ व २ रा.जुने भामपूर, ता.शिरपूर, जि.धुळे.
३) मनिषा प्रशांत देसले, रा.दलवाडे, ता.शिंदखेडा, जि.धुळे.
४) सुवर्णा दिपक वाघे, रा. एसआर नं.२९/३ए, विंग-बी, फ्लॅट नं.५०३,
सिल्वर मिस्ट, राहटनी, पुणे, जि.पुणे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही. ..... **जाबदेणार**
नथ्थू हिलाल पवार (पाटील),
मयताचा पत्ता- जुने भामपूर, ता.शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.३०/११/२०२४. ..... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील नामे नथ्थू हिलाल पवार (पाटील) हे दि.३०/११/२०२४ रोजी मौजे जुने भागपूर, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.२५/६/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून भयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिध्दीस दिली असे.

| कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
|---|---|---|
| दिवाणी न्यायालय, शिरपूर | | दिवाणी न्यायालय, शिरपूर |

पान १ वरुन

## संगम घाटावर चेंगराचेंगरी

झाला असून ५० ते ६० जण जखमी असल्याची माहिती आहे.

**शाही स्नान रद्द**

चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर प्रशासनाने अखाडा परिषदेला आजचे शाही स्नान रद्द करण्याची विनंती केली. सर्व प्रमुख १३ अखाड्यांनी आज मौनी अमावास्येनिमत्तचे अमृस्नान रद्द केले आहे. अखाडा परिषदेचे अध्यक्ष रवींद्र पुरी यांनी म्हटले की, चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**पंतप्रधान मोदींचा मुख्यमंत्री योगींना फोन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासोबत फोनवर चर्चा केली आहे. त्यांनी कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीची माहिती घेतली. कुंभमेळ्यातील या दुर्घटनेनंतर घटनास्थळी एनएसजी कमांडो तैनात करण्यात आले आहेत. संगम नोज भागात भक्तांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. प्रयागराजमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे, आणखी गर्दी वाढू नये यासाठी प्रयागराज शहराच्या सीमेवरील श्रद्धाळूंना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. प्रयागराज शहराला लागून असलेल्या जिल्ह्यांमध्येच श्रद्धाळूंना थांबवण्यात येत आहे. महाकुंभमध्ये आज मौनी अमावास्येचे पवित्र स्नान आहे. त्यामुळे भक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. एका आकडेवारीनुसार साधारण ५ कोटी लोक शहरामध्ये आले आहेत. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार संगम घाटासह ४४ घाटांवर आज उशिरा रात्रीपर्यंत ८ ते १० कोटी भक्त स्नानासाठी-डुबकी मारण्यासाठी येऊ शकतात.

## शहात्तर लाखांचा गांजा जप्त

वजन केल्यावर एकूण किंमत ७६ लाख रुपये असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी संतोष ग्यानसिंह पावरा (रा.बोरमळीपाडा), रामप्रसाद हुरजी पावरा (रा.भोईटी) यांना ताब्यात घेतले असून भावसिंह काशीराम पावरा (रा.बोरमळीपाडा) फरारी झाला. संशयितांविरोधात सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. उपनिरीक्षक सुनील वसावे तपास करीत आहेत. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर अधीक्षक किशोर काळे, डीवायएसपी सुनिल गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक जयपाल हिरे, उपनिरीक्षक सुनिल वसावे, हवालदार सागर ठाकूर, खसावद, राजू ढिसले, संदीप ठाकरे, प्रकाश भिल, धनराज गोपाळ, मुकेश पावरा, कृष्णा पावरा, अल्ताफ मिर्झा, इसरार फारुकी, मनोज पाटील यांनी ही कारवाई केली.

## शेतकऱ्याच्या घरात चोरट्यांचा डल्ला

भेट घेवून पाहणी केली. ठसे तज्ज्ञ पथकात हेकॉ. संजय रामोळे, श्वान पथकात दिलीप गावित, देवीदास नाईक, पी.ए.साठे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी पाहणी केली. दरम्यान सारंगखेडा पोलिस ठाणे हद्दीत अवघ्या १५ दिवसांत चार ते पाच धाडसी चोरीच्या घटना घडल्या आहेत. वडाळी येथेही गेल्या पंधरवड्यात शिक्षकाच्या घरी चोरी झाली होती. तेथील चोरटे देखील तापी नदी काठाने पसार झाले होते. धाडसी घरफोडीच्या घटना वाढल्याने नागरीकांमध्ये भीती पसरली आहे.

## उज्ज्वला योजनेचा उच्चस्तरीय आढावा

या भागातील गॅसधारकांची संख्या कमी असल्याने अधिक लक्ष देण्याची गरज आहे, असे श्री. मोहंती यांनी गॅस कंपन्यांना स्पष्ट निर्देश दिले. बैठकी दरम्यान श्री. मोहंती यांनी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अनुभवांची माहिती घेतली. महिलांनी गॅस जोडणीपूर्वीच्या समस्या, जसे की चुलीच्या धुरामुळे होणारा त्रास, भांडे जास्त काळे होणे, तसेच स्वयंपाक करण्यास लागणारा अधिक वेळ, या सर्व समस्या गॅस जोडणीमुळे दूर झाल्याने समाधान व्यक्त केले.

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत जिल्ह्यातील गॅस सेवांचे आणखी सुलभीकरण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधावा आणि अधिक चांगल्या सेवा द्याव्यात, असे आवाहन उपसचिव श्री. मोहंती यांनी केले.

या बैठकीला चेतन पटवारी (आयओसीएल डिव्हिजनल सेल्स हेड), इक्बाल सिद्दिकी (भारताचे माजी क्रिकेटपटू व उप महाव्यवस्थापक, इंडियन ऑइल कंपनी), पियुष गुजराथी - (बीपसीएल टेरिटरी मॅनेजर) जे. व्ही. अममिलेश्वर राव (एचपीसीएल क्षेत्रीय व्यवस्थापक) वीरेंद्र अहिरवार (आयओसीएल विक्री अधिकारी), हिमांशू स्वान (बीपीसीएल विक्री अधिकारी), गोपाल घडमोडे (एचपीसीएल) विक्री अधिकारी हे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, तसेच गॅस जोडणी प्रक्रिया अधिक सुटसुटीत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.

## प्रतिमा जाळणाऱ्यांवर कारवाई करा

निदर्शनास येते. म्हणूनच सदरच्या घटनेतील आरोपींवर देशद्रोहाच्या गुन्ह्यासह अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. आणि त्यांना तात्काळ ताब्यात घेऊन सदरची केस शीघ्र न्यायालयात चालवण्यात यावी. अशा आशयाचे निवेदन धुळे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून संविधान संरक्षण समितीच्या वतीने केंद्रीय गृहमंत्रीना निवेदन देण्यात आले.

यावेळी संविधान संरक्षण समितीचे अध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे, प्रा.बाबा हातेकर, कॉम्रेड एल.आर. राव, बी.बी. वानखेडे, पी.व्ही. अहिरे, ए.एस. शिरसाट, पि.टी. बेडसे, एम.एच. मोहिते, के.एस. शिंदे, प्रा.राम जाधव, प्रा.अनिल दामोदर, ए.डी. वाघोदे, के.एम. शेजवळ, डॉ.पापालाल पवार, ज्येष्ठ पत्रकार हेमंत मदाने, धनंजय गाळणकर, प्रा.अनिल दामोदर, दिपकुमार साळवे, डॉ.श्रीकृष्ण बेडसे, जी.डी. जाधव, छोटूलाल मोरे, सागर मोहीते, हर्षबोध मोरे, मुक्त पत्रकार रामकृष्ण शिंदे, इत्यादी संविधान प्रेमी आणि संविधान संरक्षण समितीचे जेष्ठ कार्यकर्ते उपस्थित होते.

## मनपाने कर वसुलीची वज्रमुठ आवळली

बँकेने मालमत्ताकर भरण्याबाबत नमुद केले आहे. परंतु अनेक वर्षांपासून बँकेकडून करभरणा करण्यात आलेला नाही. नोटीस दिल्यानंतर करभरणा करण्याचे बँकेकडून सांगण्यात आले. तडजोडीसाठी लोक अदालतीतही बोलवण्यात आले मात्र तेथेही येत नसल्याने अखेर मनपाच्या वसुली पथकाने महाराष्ट्र बँकेचे मुख्य कार्यालयाला सील केले.

**नागपूर सह.बँकेवरील कारवाई टळली**

शहरातील ग.नं.४ व ५ च्या बोळ मधील नागपूर सहकारी बँकेकडे मालमत्ता करापोटी चालु वर्षाचे अकरा लाखांची थकबाकी आहे. मागील वर्षापर्यंतच्य सात लाख एकोणावीस हजार दोनशे पासष्ट रूपये थकबाकीचा धनादेश वसुली विभागाकडे बँकेने सुपूर्द केला. नागपूर सह.बँकेने धनादेशाच्या माध्यमातून थकबाकी वसुली विभागाकडे जमा केल्याने कारवाईची नामुष्की टळली. ही कारवाई वसुली विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

**डोंगरे महाराज नगरातून वसुली**

पारोळा रोडवरील डोंगरे महाराज नगराल संजयकुमार चौधरी यांच्या दुकानाचेही करापोटी चार लाख शहात्तर हजार पंच्याण्णव रूपये थकबाकी आहे. मनपाचे वसुली पथक जाताच चौधरी यांनी करभरणा केल्याने कारवाई स्थगित करण्यात आली.

## पद्मश्री पुरस्कार जिल्ह्यासाठी अभिमानास्पद

चैत्राम पवार यांची बारीपाडा येथे भेट घेत सत्कार केला. भेटी दरम्यान पाटील यांनी आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्ते चैत्राम पवार यांच्याशी दिलखुलास चर्चा केली. यावेळी पवार यांनी उजाड माळरान ते स्वयंपूर्ण बारीपाडाचा प्रवास उलगडून दाखविला. लोकसहभागातून शाश्वत विकास साधत गावाचा कायापालट करण्याचे काम श्री चैत्राम पवार यांनी मागील तीन दशकात करुन दाखविले. आज बारीपाडा गाव हे स्वयंपूर्ण झाले असून येथील शेतीमध्ये विविध प्रकारची बागायती पिके घेतली जात आहे. शेतीपूरक व्यवसाय सुरु करुन महिला बचत गटातून महिला व गाव सक्षम करण्याचे काम झाले आहे. या सर्व यशाचे श्रेय ग्रामस्थांचे असल्याचे सामाजिक कार्यकर्ते चैत्राम पवार यांनी सांगितले.

पान १ वरुन

## आरोपीस कोर्टाने सुनावली जन्मठेप

दोघांत वारंवार वाद होत होते. दि.५ मे २०१७ रोजी सकाळी दहा वाजता मोगराईधार टेकडी येथे सुरेश थवील गुरे चारण्यासाठी गेला होता. संधी साधून विजय पवार याने लाकडी दांडक्याने सुरेश थवील यांना लाकडी दांडक्याने व दगडाने मारहाण केली. तसेच जवळील चाकुने सुरेश थवीलच्या छातीत भोसकून ठार केल्याची घटना घडली. या प्रकरणी सपोनि.सुनिल भाबड यांनी आरोपी विरोधात दोषारोपपत्र दाखल केले होते. या खटल्याची सुनावणी धुळे येथील जिल्हा व सत्र न्यायालय धुळे येथे न्यायाधीश माधुरी आनंद सो. यांच्या समोर कामकाज सुरू होते. अति.शासकीय अभियोक्ता गणेश वाय.पाटील यांनी फिर्यादी शांताराम थवील, घटनास्थळ, कपडे जप्ती, हत्यार जप्ती, वैद्यकीय अधिकारी, शवविच्छेदन करणारे वैद्यकीय अधिकारी तसेच तपासी अंमलदार सुनिल भाबड यांची साक्ष नोंदवली. अशा एकुण आठ साक्षी नोंदवल्यात आल्या. अॅड.गणेश वाय.पाटील यांनी प्रभावी युक्तीवाद केल्याने न्यायालयाने आरोपी विजय पवार याला भादंवि कलम ३०२ अन्वये जन्मठेपेची शिक्षा तसेच दहा हजार रूपये द्रव्यदंड रक्कम भरण्याचा आदेश केला. व दंड न भरल्यास एक महिना कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. पैरवी अधिकारी एएसआय. जडे व पोहेकॉ.स्मीथ चव्हाण यांनी सहकार्य केले.

## आज वर्धापन दिन कार्यक्रम

मान्यवर उपस्थित राहणार आहेत. उपस्थितीचे आवाहन संघाचे अध्यक्ष डॉ.पापालाल पवार, उपाध्यक्ष लेखक अशोक बागुल, उपाध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे, सचिव प्रा.राम जाधव, कोषाध्यक्ष कवी दत्तात्रय कल्याणकर, श्रीमती रंजना नेवे, कवी सुनिल बोरसे, डॉ. श्रीकृष्ण बेडसे, कवी मुरलीधर पांडे, साहित्यिक गुलाबराव मोरे, कलावंत योगेश बागुल यांनी केले आहे.

## एक दिवसाआड पाणी पुरवठ्याचे नियोजन

करण्यात येणार आहे तसेच उर्वरीत तीस टक्के भागांस जलवाहिन्यांमधील काही बदल करून दोन महिन्यांनंतर एकदिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. धुळेकर जनतेने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्याच्या भावनाही आ.अग्रवाल यांनी पत्रकातुन व्यक्त केल्या आहेत.

## जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत..

तक्रारी व कृषी उत्पन्न बाजार समिती शिरपूर सोबत व्यापारी संचालक राजु जैन व व्यापारी संघटनेचे युवराज जैन तसेच सचिव वसंत बुवा यांनी लेखी निवेदन जिल्हाधिकारी जितेंद्र पापडकर यांना दिले. महाराष्ट्रात सर्वात जास्त हमालीचे दर धुळे जिल्ह्यात असून पदाधिकाऱ्यांनी दरवाढ करण्यात येऊ नये असेही सांगितले.

## मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशारा

विनंती केलेली आहे. ग्रामसभेच्या ठरावाच्या विरोधात जावून त्याठिकाणी तलाठी कार्यालयाचे काम प्रस्तावित असल्याचे प्रशासनाने दि.२६ जानेवारी रोजी भुमीपूजन केले. हे अन्यायकारक आहे. मालमत्ता क्र.८११ च्या जागेवर बुध्दविहार, अभ्यासिका उभारण्यात यावे अन्यथा प्रशासनाच्या विरोधात मुंबई मंत्रालयावर भव्य मोर्चा काढण्याचा इशारा सिध्दार्थ जगदेव, भुषण ब्राम्हणे, शरद वेंदे, पं.स.सदस्य रंगुबाई मोरे, माजी पं.स.सदस्य कविता बागुल, कोळी महासंघाचे शांताराम कोळी, आत्माराम नन्नवरे, संदीप बोरसे, संदीप मगर, सिध्दार्थ बागुल, भिमराव बागुल, नाना निकम, विमलाबाई बागुल, रेखा मगर, सविता मगर, अरूणा मगर यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

## माळी महासंघातर्फे वधु-वर मेळावा

धुळे, दि.२९- पारोळा रोडवरील छत्रपती शाहु महाराज नाट्यगृह येथे दि.१६ फेब्रवारी रोजी सकाळी दहा ते दुपारी चार वाजेच्या कालावधीत खान्देश माळी महासंघातर्फे माळी समाजातील सर्व पोटशाखांसाठी भव्य राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. वधु-वरांच्या नोंदणीसाठी पालकांनी जी.टी. पी.स्टॉप कारबाजार आग्रारोड देवपूर धुळे येथे दि.२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सकाळी दहा ते सायंकाळी सात वाजेपर्यंत संपर्क साधण्याचे आवाहन माजी प्राचार्य एस.टी.चौधरी, बी.बी.महाजन, बी.एच.जाधव, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माळी, एकनाथ माळी, डॉ.सुनिल वाघ, कैलास पाटील, परमेश्वर माळी, कैलास बागुल यांनी केले आहे.

## जिल्हा बँकेच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

धुळे- शिवाजी रोड येथील धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.च्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनानिमित्त बँकेचे ज्येष्ठ संचालक मा.आ.प्रा.शरद पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी माजी आ. पाटील यांनी प्रजासत्ताक दिन, संविधानाचे महत्व विषद केले. कार्यक्रमाप्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धिरज चौधरी, सरव्यवस्थापक, सर्व विभागाचे व्यवस्थापक व इतर सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**उठावणा**



शा गुलाबचंदजी जवेरचंदजी परमार इनके बड़े लड़के
स्व.शा किरणकुमार गुलाबचंदजी परमार (उम्र ४५)
का दु:खद निधन दि.२५/१/२५ को हुआ है,
उसके निमित्त उठावना
दि.३०/१/२५ गुरुवार को दोपहर १२ बजे रखा है!
स्थान : श्रावगी भवन गल्ली न.२ से
श्री शीतलनाथ मंदिरजी मे!
-: शोकाकुल परिवार :-
पिताजी शा गुलाबचंदजी, भाई हितेश
धुलिया (राज.कालंद्री)
एवं समस्त शा जवेरचंदजी सुरतिगजी परमार परिवार!

**पाहिजेत**
* वेटर/हेल्पर - जागा ३ पगार ८०००/- ते ९०००/-
* बोलेरो गाडीसाठी ड्रायव्हर जागा - २
समक्ष भेटा!
श्री अन्नपूर्णा जलगाववाला
मावा कुल्फी, म.गांधी चौक, धुळे (कॉर्नरची दुकान)

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी खालील जागा भरणे आहे.
सेल्समन- २
हेल्पर- २
समक्ष येवून भेटा!
बेबीज वर्ल्ड
ग.नं.२, लालबाग मंदिर जवळ, धुळे
9850835999

**बंगलो व फ्लॅट विकणे आहे**
पारोळा रोड लगत कॉटन मार्केट जवळ 2 BHK फ्लॅट व 4 BHK बंगला विकणे आहे.
-: संपर्क :-
9822545666

**पाहिजेत**
डेली कम्युनिकेशनसाठी अनुभवी माणूस पाहिजे. मोटारसायकल असल्यास प्राधान्य.
मनोहरलाल मोहनलाल
पी-१८, एमआयडीसी, मानस हॉटेल शेजारी, अवधान,धुळे
9226513121

**गोडाऊन भाड्याने देणे**
पारोळा रोड - वरखेडी रोड लगत सोयीनुसार १००० चौ. फूट ते ३५०० चौ.फूट २० फूट उंचीचे गोडाऊन भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9422786734

**पाहिजेत**
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) सेल्समन
३) ड्रायव्हर
अर्जासह समक्ष भेटणे
सोना सुपर शॉप
१०४, जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे
9923124606

**लेडिज सेल्समन पाहिजेत**
रेडिमेड कापड दुकानासाठी हुशार, अनुभवी लेडिज सेल्समन पाहिजेत.
-: संपर्क :-
रुणवाल एम्पोरियम
बॉम्बे लॉजजवळ, आग्रारोड, धुळे
संजय रुणवाल
9422289284
भेटण्याची वेळ : स.९ ते १२ वा.पर्यंत

**पाहिजे**
ऑफिससाठी फोनवर उत्कृष्ठ संभाषण करणारा व फोर व्हीलर गाडी चालवणारा अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.
समक्ष भेटा!
-: संपर्क :-
9823178279

**पाहिजेत**
भारत ऑटो कॉर्पोरेशन ह्या दुचाकी शोरुमसाठी खालील जागा भरणे आहेत.
१) स्पेअर पार्ट इन्चार्ज - जागा एक
२) वर्कशॉप सुपरवायझर - जागा एक
३) टेलिकॉलर - जागा एक
बायोडाटा व पगाराच्या अपेक्षेसह समक्ष भेट देणे!
भारत ऑटो कॉर्पोरेशन
पारोळारोड, प्रकाश टॉकिजसमोर, धुळे

**भाड्याने देणे**
वलवाडी शिवार आधार नगरला लागून सर्व्हे नं.१२६ मधील पक्के गोडाऊन भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9011894666

**पाहिजे**
हॅाटेलसाठी मॅनेजर पाहिजे (संगणकचे ज्ञान आवश्यक)
हॉटेल गौरव
मालेगावरोड, अग्रसेन चौक, धुळे
8698442361
8262022328

**मोक्याची जागा विकणे**
गल्ली नं.४,५,६ मधील व्यवसायासाठी उपयुक्त अशी मोक्याची जागा विकणे आहे.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट लायक शेती विकणे**
गोंदूर आणि भोकर शिवारात प्लॉटिंग ची शेती विकणे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**रोडटच शेती विकणे**
चाळीसगाव रोड टच आणि साक्री रोड टच हॉटेल, मॅरेज लॉन, मंगल कार्यालयासाठी उपयुक्त एक एकर आणि दोन एकर शेती विकणे आहे.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**रोडटच प्लॉट विकणे**
डाव्हर्शन रोडला लागून नालंदा हॉटेल समोर रोडटच प्लॉट विकणे आहे.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

धुळ्यात 'प्लास्टो' कंपनीचे आऊटलेट सुरू..
होलसेल रेटमध्ये सर्व साईजच्या टाकी उपलब्ध..




१०० ते १०००० लिटर पर्यंत क्षमता असलेल्या ३ लेयर, ४ लेयर, ६ लेयर, ८ लेयर मध्ये सर्व साईजच्या गोल व चौरस टाक्या हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहेत.
धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण
शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे. मो. 9422285091

**पाहिजेत**
सोलर सिस्टम विक्रीसाठी सेल्समन व सेल्सगर्ल त्वरित लावणे आहे.
- संपर्क -
मो. 7249728713
7972126440

**हेल्पर पाहिजेत**
फर्निचर दुकानाकरिता हेल्पर पाहिजेत. अनुभव असल्यास प्राधान्य.
समक्ष भेट सायं.६ ते ८
फर्निचर फर्स्ट
जेबी रोड, टॉवर बगीचा जवळ, धुळे
9420257475
8766836880

Godrej
२५ वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट आणि वाढीव वॉररंटी...
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

**पाहिजे**
दुकान कामासाठी मुलगा पाहिजे.
गांधी पुतळा, धुळे
-: संपर्क :-
9923733667

**पाहिजेत**
एजन्सीच्या कामासाठी माणूस व इले.कामासाठी हेल्पर-सेल्समन पाहिजे.
किसान केंद्र
नगरपट्टी, धुळे
8799922502
9730125577

**फ्लॅट भाड्याने देणे**
मालेगाव रोड, विठ्ठल मंदिर समोर अग्रसेन सोसायटी मधील 2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
अवचीत बाजीराव देवरे
9763570776

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०